**<u>नियमीत फौजदारी प्रकरण १०१/२०११</u>**
**<u>सुनिता विरुध्द ईश्वर</u>**

<u>निशाणी क्रमांक ३० वरील आदेश</u>

(दिनांक १८/०५/२०२३)

१. प्रस्तुत अर्ज फिर्यादी तर्फे वैदयकिय प्रमाणपत्रांना निशाणी क्रमांक देण्यासाठी सादर केला आहे.

२. फिर्यादीने असे कथन केले आहे की, सदर प्रकरणामधे सुनिता अशोक ताथोड, अशोक ताथोड आणि शुभम ताथोड यांची वैदयकिय तपासणी डॉ.जि. बी.शेडोळे यांनी केल्याबाबतची तिन प्रमाणपत्रे दिनांक १७/०३/२०२२ रोजी जिएमसी अकोला यांनी सादर केलेले असुन डॉ.जि.बी.शेडोळे यांचा पुरावा न्यायालयात झालेला आहे. परंतु पुराव्याच्या वेळी सदर प्रमाणपत्रांना केवळ ओळखीपुरते निशाणी क्रमांक देण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदर प्रमाणपत्रांना निशाणी क्रमांक देण्यात यावे अशी विनंती फिर्यादी यांनी केलेली आहे.

३. आरोपी तर्फे त्याच अर्जावर म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जास प्रखर विरोध केलेला आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर अर्ज न्यायप्रक्रियेत बसत नाही. सदरचे तथाकथीत रजिष्टर तपासले शिवाय निशाणी देणे योग्य नाही. फिर्यादी ने दाखल केलेल्या अर्जामधे काही तथ्य नाही त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा अशी विनंती आरोपी यांनी केलेली आहे.

४. अर्ज व म्हणणे पाहीले. अभिलेख तपासला फिर्यादी आणि आरोपीच्या विधीज्ञांना युक्तीवाद ऐकला.

५. दिनांक ३०/११/२०१९ रोजी डॉ.गुंडेराव बाबुराव शेडोळे (साक्षीदार क्रमांक ४) यांची साक्ष निशाणी क्रमांक ११६ अन्वये नोंदविण्यात आलेली दिसुन येत आहे. सदर पुराव्यामधे निशाणी क्रमांक ११७, ११८ आणि ११९ नुसार वैदयकिय प्रमाणपत्रांना ओळखीपुरते निशाणी क्रमांक देण्यात आलेले आहे.सदर पुरावा नोंदणीच्या दिवशी वैदयकिय प्रमाणपत्राची केवळ छायांकित प्रत सादर केलेली होती. त्यानंतर दिनांक २२/०२/२०२२ रोजी वैदयकिय अधिक्षक, शासकिय वैदयकिय महाविदयालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला यांना वैदयकिय प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती सादर

करण्याकरीता कळविण्यात आले होते. सदर पत्राच्या अनुषंगाने दिनांक १६/०३/२०२२ रोजी निशाणी क्रमांक १२९ नुसार रजि.प्रमाणत्र क्रमांक ९६४५, ९६४६ आणि ९६४७ एकुण तिन वैदयकिय प्रमाणत्रांच्या प्रमाणित प्रती सादर केलेल्या आहेत. तसेच सदर प्रमाणपत्रांच्या प्रती आरोपीला त्याच दिवशी पुरविण्यात आले आहेत.

६. दिनांक ३०/११/२०१९ रोजीच्या निशाणी क्रमांक ११६ वरिल डॉ.जि बी शेडोळे यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येत आहे की, सदर डॉक्टरांनी ज्या वैदयकिय प्रमाणपत्राच्या आधारे साक्ष दिलेली आहे त्याच्या प्रमाणीत प्रती न्यायालयाच्या अभिलेखावर दाखल नसल्यामुळे त्यास ओळखीपुरता निशाणी क्रमांक देण्यात आलेले होते. आणि पुढे असे नमुद करण्यात आलेले आहे की, ज्यावेळी सदर प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती न्यायालयात दाखल करण्यात येतील त्यावेळी मुळ प्रत आणि अभिलेखावरील प्रत ताडुन पाहिल्यानंतर सदर प्रमाणपत्रे पुराव्यात वाचता येतील.

७. वैदयकिय अधिक्षक, शासकिय वैदयकिय महाविदयालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला यांच्या मार्फत सादर करण्यात आलेल्या प्रतिंचे अवलोकन केले असता असे दिसुन येत आहे की, त्यावर वैदयकिय अधिक्षकांचा शिक्का व सही असल्याचे दिसुन येत आहे तसेच निशाणी क्रमांक १२९ मधील पत्रामधे असे नमुद केलेले आहे की, सन २०११ सालचे रजि प्रमाणपत्र न्यायालयाच्या आदेशानुसार सादर करण्यात येत आहेत.

८. याठिकाणी असे नमुद करणे आवश्यक आहे की, सदर केलेली प्रमाणपत्रे योग्य अभिरक्षेतुन सादर करण्यात आलेली आहेत. त्यावर अधिक्षकांची सही व शिक्का आहे. डॉ.जि बी शेडाळे यांनी याच प्रमाणत्रांच्या छायांकित प्रतीवरुन त्यांचा साक्ष पुरावा दिला आहे तसेच त्यांची सही मान्य केलेली आहे.

९. वरिल सर्व बाबी विचारात घेता आरोपीच्या विधीज्ञांनी घेतलेल्या आक्षेपामधे तथ्य दिसुन येत नाही. त्यामुळे सदर प्रमाणपत्रांना ओळखीपुरते देण्यात आलेले निशाणी क्रमांक कायम करण्यात येत असुन पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

वैदयकिय प्रमाणत्रांना खालील प्रमाणे निशाणी क्रमांक देण्यात येत आहे.

१. प्रमाणपत्र क्र.९६४५ सुनिता ताथोड निशाणी क्रमांक ११७

२.प्रमाणपत्र क्र.९६४६ अशोक ताथोड निशाणी क्रमांक ११८

३.प्रमाणपत्र क्र.९६४७ शुभम ताथोड निशाणी क्रमांक ११९

VISHNU DATTARAO GITE

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2023.05.18 17:27:31 +0530

दिनांक : १८/०५/२०२३

ठिकाणः बाळापूर

( विष्णु द. गिते )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२), बाळापूर.

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same words as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Court Name | : | Jt. C.J.J.D., Balapur |
| Name of Stenographer | : | Shri. Shaikh Rafique |
| Date of Judgment | : | 18/05/2023. |
| Order Signed by P.O. on | : | 18/05/2023. |
| Order uploaded on | : | 18/05/2023. |